महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक : सुप्रमा-१२१६/प्र.क्र.८२८/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१७.

विषय :- उपविभागीय पोलीस अधिकारी, चाकूर, जिल्हा-लातूर, यांच्या कार्यालयासाठी नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी नवीन प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :-
१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक सीआरपी-०४०४/६६०/प्र.क्र.६८/पोल-७, दिनांक ०३.०७.२००४.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ निवासी-व-अनिवासी-बांध./ २७२/ २०१५, दिनांक ०२.०४.२०१६.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ निवासी-व-अनिवासी-बांध./ २७२/ २०१५, दिनांक ०४.०९.२०१७.

ज्ञापन.-

उपविभागीय पोलीस अधिकारी, चाकूर, जिल्हा-लातूर, यांच्या कार्यालयासाठी, नियंत्रण कक्षासह, नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक सीआरपी-०४०४/६६०/प्र.क्र.६८/पोल-७, दिनांक ०३.०७.२००४, द्वारे रु.११,७०,०००/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, उक्त कामासाठी जागा उपलब्ध न झाल्यामुळे उक्त काम सुरु करता आले नाही.

२. आता उक्त कामासाठी सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले **रु.६९.८५ लक्ष** इतक्या खर्चाचे अंदाज, प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या विनंतीसह, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांच्या कार्यालयाचे दिनांक ०२.०४.२०१६ रोजीच्या पत्राद्वारे सादर करण्यात आले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चाकूर, यांनी तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर, यांनी साक्षांकित केले आहेत.

४. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.७९.५९ लक्ष** असे सुधारित केले आहेत आणि, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

५. त्या अनुसार, शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक सीआरपी-०४०४/६६०/ प्र.क्र.६८/ पोल-७, दिनांक ०३.०७.२००४, यास अधिक्रमित करुन, उपविभागीय पोलीस अधिकारी, चाकूर, जिल्हा-लातूर, यांच्या कार्यालयासाठी नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम

करण्यासाठी **रु.७९.५९ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, नवीन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) बांधकामाचा नमुना नकाशा, मांडणी नकाशा आणि विस्तृत नकाशा यांना वास्तुशास्त्रज्ञाकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.
२) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.
३) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदींबाबत विस्तृत खर्चाचे अंदाज मंजूर करुनच काम हाती घ्यावे.
४) प्रत्यक्ष काम करताना शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४, अनुसार कार्यवाही करावी.
५) निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करु नये.
६) पोलीस अधीक्षक, लातूर, यांनी खर्चाचे अंदाज साक्षांकित करावे.

६. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, (४०७० ०२११), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४१३/इमा-२, दिनांक २४.०३.२०१७, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७१११७१८५५४३१९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.11.17 18:59:30 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड.
३) पोलीस अधीक्षक, लातूर.

प्रत :-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, उस्मानाबाद *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*

३) जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर.

४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.

७) निवड फाईल (पोल-७).